# पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.

कार्यालयाचा पत्ता : पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) कार्यालय,
कनकिया रोड, सँथोम शाळेजवळ,
मिरा-रोड(पुर्व), ठाणे. ४०११०७


जावक क्रमांक :-०८२०३ /२०२४ दिनांक :-११/११/२०२४

(महाराष्ट्र विधानसभा निवडणुक ,२०२४ संदर्भाने)

**-:नोटीस:-**

**( भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे )**

प्रति,
सर्व सोशल मिडियावरील ग्रुप ॲडमिन व सदस्य,
मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय हद्दीतील

१/- आपणास या द्वारे कळविण्यात येते की, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी पासुन संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये विधानसभा निवडणुक २०२४ करिता आदर्श आचार संहिता लागु आहे. त्या अनुषंगाने सध्या राज्यामध्ये फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर वगैरे सोशल मिडियाचे माध्यमातून राजकिय, सामाजिक, जातीय, धार्मिक विषयांवरुन तेढ निर्माण करणारे पोस्ट व्हायरल होत आहेत. तरी आपण वापरत असलेले सोशल मिडिया मार्फत चर्चेमधून (इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअप, ट्विटर, टेलिग्राम) किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे दोन गटांमध्ये सामाजिक, जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह संदेश तयार करुन फॉरवर्ड करणे सामाजिक स्वास्थ्य बिघडेल असे कृत्य करणे, प्रत्यक्ष धर्म, जात, पंथ याबाबत प्रक्षोभक वक्तव्य करणे इत्यादी कारणामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अथवा आदर्श आचारसंहितेचा भंग होईल असे कृत्य करीत असल्यास आपणास वैयक्तीक रित्या जबाबदार धरण्यात येईल.

२/- संपुर्ण मिरा भाईंदर आयुक्तालयाकडील क्रमांक/पो.आ.वा./अधि.प्रदान/आदेश/३०/२०२० दिनांक.०९/११/२०२० अन्वयेए मा.पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) चे वापरावयाचे अधिकार याव्दारे सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र जमण्यास मनाई केली असुन शस्त्र बंदी आदेश लागु केले आहेत. तसेच मा. निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य, यांनी आदर्श आचारसंहिता व निवडणुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी मार्गदर्शक सुचना जाहीर केलेल्या आहेत. यांची नोंद घ्यावी. तरी आपल्याकडुन सोशल मिडियाच्या माध्यमातुन कोणतेही बेकायदेशीर कृत्य होवु नये ही आपण भारतीय नागरिक असल्याने सर्वस्वी जबाबदारी आपली आहे.

३/- त्याअर्थी मी सुजितकुमार गुंजकर पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय, मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन या नोटीस द्वारे फर्मावतो की, आपण तसेच आपले सोशल मिडिया अकाऊंट चे माध्यमांद्वारे दोन गटांमध्ये, सामाजिक, जाती, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह पोस्ट/मेसेज व्हायरल होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेस बाधा आल्यास अथवा तशी परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास तुमच्या विरुध्द प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या संबंधाने होणारे कारवाईमध्ये सदरची नोटीस ही कोर्टात आपल्याविरुध्द कायदेशीर पुरावा म्हणून सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस ही माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ११ नोव्हेंबर, २०२४ रोजी देय आहे.

ठिकाण:- सायबर पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय.
प्रत सोशल मिडियाद्वारे –
( टिप- सदरची सोशल मिडियाद्वारे बजावलेस ग्राह्य धरण्यात येईल. )

सायबर पोलीस ठाणे
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**( सुजितकुमार गुंजकर )**
**पोलीस निरीक्षक**
**सायबर पोलीस ठाणे,**
**मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय**